राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बसेसमध्ये कर्तव्यार्थ प्रवास करणा-या पोलीस/कारागृह कर्मचारी व कैदी यांचे प्रवासभाडे (एस.टी. वॉरंट) अदा करण्याच्या कार्यपध्दती बाबत...

महाराष्ट्र शासन

परिवहन विभाग

शासन निर्णय क्र.एसटीसी-१०२६/प्र.क्र.१०९/परि-१

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

दिनांक : १६ नोव्हेंबर, २०२६

संदर्भ :-

१) गृह विभाग शासन निर्णय क्र. STC 1978/360- POL-5 दि. २७.०९.१९७९.
२) उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, मुंबई यांचे पत्र क्र.राप/वाह/सवलत/५६८४, दि.२९.०९.२०२६.

प्रस्तावना :-

राज्य परिवहन महामंडळाच्या बसेसमध्ये कर्तव्यार्थ प्रवास करणा-या पोलीस, कारागृह कर्मचारी व कैदी यांना रोख प्रवासभाडे अदा न करता पोलीस मोटार वॉरंटवर प्रवास करण्याची मुभा गृह विभागाच्या संदर्भाधिन शासन निर्णयान्वये अनुज्ञेय करण्यात आली आहे. सदर शासन निर्णयानुसार कर्तव्यार्थ प्रवास करणा-या पोलीस, कारागृह कर्मचारी व कैदी यांच्या प्रवास खर्चाच्या एकत्रित एकूण ढोबळ रक्कमेचे रक्कमेचे विविरणपत्र राज्य परिवहन महामंडळाद्वारे तयार करण्यात येते.

२. राज्य परिवहन महामंडळाच्या बसेसमध्ये कर्तव्यार्थ प्रवास करणा-या पोलीस, कारागृह कर्मचारी व कैदी यांच्या प्रवास खर्चाची रक्कम पोलीस व कारागृह विभाग यांनी अदा करण्यासाठी सन १९८१-८२ या वर्षाकरीता ९०:१० व सन १९८३-८४ या वर्षापासून पुढील कालावधीकरीता ९१.५०:८.५० असे गुणोत्तर निश्चित करण्याचा निर्णय तत्कालीन सचिव (गृह) यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या दि.०३.०४.१९८७ रोजीच्या बैठकीत घेण्यात आला. सदर निर्णयानुसार राज्य परिवहन महामंडळाद्वारे कर्तव्यार्थ प्रवास करणा-या पोलीस, कारागृह कर्मचारी व कैदी यांच्या प्रवास खर्चापोटीच्या एकूण ढोबळ रक्कमेची प्रत्येक आर्थिक वर्षाकरीता पोलीस व कारागृह विभाग असे स्वतंत्र लेखाशिर्षला नोंदी न ठेवता लेखाशिर्ष ६२० अंतर्गत आजपर्यंत एकत्रित नोंदी ठेवण्यात येत आहेत.

३. सद्यस्थितीत राज्य परिवहन महामंडळाच्या बसेसद्वारे कर्तव्यार्थ प्रवास करणारे कारागृह कर्मचारी व कैदी यांच्या प्रवास खर्चापोटी झालेला प्रत्यक्ष खर्च हा गुणोत्तरानुसार कारागृह विभागाकडून देय होणाऱ्या रकमेपेक्षा कमी होत असल्याने, कारागृह विभागाकडून प्रत्यक्ष खर्च रकमेपेक्षा अतिरिक्त रक्कम परिवहन महामंडळास अदा झालेली आहे. त्यामुळे, उपरोक्त गुणोत्तराप्रमाणे प्रवास खर्चाची रक्कम अदा करण्याची पध्दती रद्द करून, प्रत्यक्ष खर्चाप्रमाणे रक्कम अदा करण्यासाठी सुधारित कार्यपद्धती लागू करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

४. सन २०२६-२७ या आर्थिक वर्षापासून राज्य परिवहन महामंडळाच्या बसेसमध्ये कर्तव्यार्थ प्रवास करणा-या पोलीस, कारागृह कर्मचारी व कैदी यांनी पोलीस मोटार वॉरंटवर केलेल्या प्रवास खर्चाची नोंदणी राज्य परिवहन महामंडळाने एकत्रित न करता पोलीस विभाग व कारागृह विभागाची नोंदणी स्वतंत्रपणे करण्यास शासन मान्यता देत आहे. तसेच, राज्य परिवहन महामंडळामार्फत पोलीस व कारागृह विभाग यांना सादर करण्यात येणारी पोलीस मोटार वॉरंटबाबतची देयके यापूर्वी पोलीस विभाग- ९१.५०% व कारागृह विभाग- ८.५०% अशा गुणोत्तर प्रमाणात सादर करण्यात येत होती. आता हे गुणोत्तर प्रमाण रद्द करण्यात येत असून, सदर देयके पोलीस व कारागृह विभागाकडून होणा-या प्रत्यक्ष खर्चानुसार सादर करण्यात येतील.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०२६१११६१२४८०९५२३९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

CHETAN BALASAHEB NIKAM

Digitally signed by CHETAN BALASAHEB NIKAM
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Home Department, 2.5.4.20=946F8EFF01148466E26F8D80863DA34D0A26661F5EEFB602C359549D8ED4511E, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=7268DE40660971F80951C66D0E657E903B378196F51A978D2A366CF5EB564C0C, cn=CHETAN BALASAHEB NIKAM
Date: 2026.11.16 12:49:17 +05'30'

(चेतन निकम)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई.
२) मा.सभापती, महाराष्ट्र विधान परिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
३) मा.अध्यक्ष , महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.

४) मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
५) मा. उपमुख्यमंत्री (नगरविकास, गृहनिर्माण व सा.बां.(सा.ऊ.)) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
६) मा. उपमुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क, क्रीडा व युवक कल्याण, अल्पसंख्यांक) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
७) मा.मंत्री (परिवहन), यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
८) मा.राज्यमंत्री (नगरविकास, परिवहन, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य, वैद्यकीय शिक्षण, अल्पसंख्याक विकास व औकाफ), यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
९) मा. विरोधी पक्षनेते, महाराष्ट्र विधान सभा/विधान परिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,मुंबई.
१०)मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, यांचे वरिष्ठ स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
११) अपर मुख्य सचिव (परिवहन), मंत्रालय, मुंबई.
१२) अपर मुख्य सचिव, (गृह), मंत्रालय, मुंबई.
१३) अपर मुख्य सचिव, (अपिल व सुरक्षा), मंत्रालय, मुंबई
१४) परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१५) उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, मुंबई.
१६) वित्तिय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, मुंबई.
१७) महालेखापाल १/२ (लेखा व अनुज्ञेयता /लेखा परिक्षा), महाराष्ट्र, मुंबई / नागपूर.
१८) महालेखापाल (वाणिज्यिक लेखा परीक्षा), मुंबई/नागपूर.
१९) निवडनस्ती, परिवहन-१